# पोलीस आयुक्त, नवी मुंबई

## पोलीस शिपाई चालक भरती - २०१९

जाहिरात क्रमांक :- पोआ/नमुं/आस्था-६/पो.शि.चा.भरती-२०१९/४११/२०१९ दिनांक २९/११/२०१९

पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक यांची १०३ रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदन पत्र संगणकीय प्रणालीद्वारे दिनांक ०२/१२/२०१९ ते दिनांक २२/१२/२०१९ या कालावधीत भरण्यात येणार आहेत. ह्या बद्दलची सविस्तर माहिती **www.mahapariksha.gov.in** व **www.navimumbaipolice.gov.in** आणि **www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहिती करीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- महाराष्ट्र सहायक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम,२०१९ मधील तरतुदी पोलीस शिपाई चालक पदासाठी लागु आहेत.
- पोलीस शिपाई चालक पदासाठी उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावा लागेल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुवीधा www.mahapariksha.gov.in या पोर्टलवर उपलब्ध राहणार आहे. पोलीस शिपाई चालक पदासाठी एकाच पोलीस घटकात एकापेक्षा जास्त अर्ज करण्यास मुभा नाही. जर एका उमेदवाराने एकाच पोलीस घटकातील पोलीस शिपाई चालक पदासाठी एकापेक्षा अधिक अर्ज केलेले आहेत, असे आढळुन आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.
- पोलीस शिपाई चालक पदाच्या आवेदन अर्जासाठी उमेदवाराची लेखी परीक्षा महापरीक्षा पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने आधी घेण्यात येणार आहे. शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे मोजमाप व शारिरीक चाचणी उमेदवाराने ज्या पोलीस घटकासाठी अर्ज केला आहे, त्या पोलीस घटकामार्फत घेण्यात येईल. दोन घटकातील शारिरीक चाचणीच्या तारखा एकाच दिवशी आल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही व त्यामध्ये बदल करता येणार नाही.
- उमेदवारांनी आवेदन अर्जात अचुक माहिती द्यावी. चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. उमेदवारांची लेखी परीक्षा व शारिरीक चाचणी नंतर ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांचीच सर्व मुळ कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ लेखी परीक्षा व शारिरीक चाचणी द्वारे निवड झाली म्हणुन तो पात्र ठरणार नाही.
- **सेवाप्रवेश नियमामधील तरतुदीनुसार भरती प्रक्रीयेमध्ये प्रथम लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यानंतर गुणवत्तेनुसार शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी घेण्यात येईल. सहरहू वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी ही अर्हता चाचणी असेल. त्यानंतर उमेदवारांची शारिरीक चाचणी घेण्यात येईल.** ऑनलाईन घेण्यात आलेली लेखी परीक्षा व शारिरीक चाचणी उमेदवारांना प्राप्त झालेल्या एकुण गुणांच्या गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसुची तयार करण्यात येईल. तात्पुरत्या निवडसुचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसुचीमध्ये समोवेश केला जाईल. निवड यादीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (Provisional Selection) असेल. निवडयादीमध्ये उमेदवारांच्या नावाचा समावेश झाला म्हणुन नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.
- जाहिरातीतील नमुद केलेल्या रिक्त पदांची एकुण संख्या/ पुर्ण पदे भरण्याबाबत शासन आदेशाच्या अधिन असेल. पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडीबाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.
- पोलीस शिपाई चालक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/ कागदपत्रे, सामाजीक व समांतर आरक्षणाबातची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना **www.mahapariksha.gov.in** या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. सदरहू जाहिरात काळजीपूर्वक वाचून, समजून घेवून व रिक्त पदांबाबतची खातरजमा करुन उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.

(राजकुमार व्हटकर)
अध्यक्ष,
पोलीस शिपाई चालक भरती समिती २०१९,
तथा पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई.

Scanned by CamScanner